शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता यांचा परिविक्षा कालावधी समाप्त करुन नियुक्ती पुढे सुरु ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. पकास-३४१६/प्र.क्र.१२५/१६/तांशि- ७,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २४ जानेवारी, २०१८

पहा :- संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. ४अ/आस्था/ परिविक्षा/ २०१६/ ५०७, दि. २६/५/२०१६,दि.३०/५/२०१६,दि.२९/३/२०१७ व दि.१७/६/२०१७.

शासन निर्णय:-

शासकीय तंत्रनिकेतनामधील, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट - अ, या संवर्गातील शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई येथील संबंधित अधिव्याख्याता यांनी दोन वर्षांचा परिविक्षा कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केला आहे. त्यामुळे त्यांचा परिविक्षा कालावधी विवरणपत्रातील स्तंभ क्र. ६ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन समाप्त करण्यात येत आहे व त्यांची नियुक्ती पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	उमेदवाराचे नांव, पदनाम व ज्या संस्थेत कार्यरत आहेत त्या संस्थेचे नांव	नियुक्तीचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	कार्यभार धारण केल्याचा दिनांक	परिविक्षा कालावधीत उपभोगलेली रजा	परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचा दिनांक
१.	२.	३.	४.	५.	६.
१	श्रीमती सुचेता चेतन धीर, अधिव्याख्याता अणुविद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई.	एससीटी-६५१० /(१७०/१०)/ तांशि-१, दि. २०/१०/२०१०	१२/११/२०१० (म.पू.)	**अर्जीत रजा (रोख देय न होणारा)** दि.१६/८/२०११ ते २०/८/२०११ **एकूण ५ दिवस व इतर १४ दिवस (एकूण १९ दिवस)**	३०/११/२०१२ (म.नं)
२	श्रीमती वंदना शिवाजी लोखंडे, अधिव्याख्याता संगणक अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई.	एससीटी-६५१०/(२५३/१०)/ तांशि-१ दि. ११/२/२०११	१४/२/२०११ (म.नं.)	**असाधारण (प्रसूती रजा)** दि. १८/५/२०११ ते १५/११/२०११ **एकूण १८२ दिवस** **अर्जीत रजा (रोख देय न होणारा)** दि. २८/२/२०१२ ते ३/३/२०१२ एकूण ५ दिवस व इतर २ दिवस **एकूण ०७ दिवस** **असाधारण (वैद्यकीय कारण)** दि. २८/११/२०१२ ते ३/१२/२०१२ **एकूण ६ दिवस** **प्रसूति रजा** दि. २६/८/२०१३ ते दि. २१/२/२०१४ **एकूण १८० दिवस**	१४/२/२०१४ (म.नं)

अ.क्र.	उमेदवाराचे नांव, पदनाम व ज्या संस्थेत कार्यरत आहेत त्या संस्थेचे नांव	नियुक्तीचा शासन निर्णय क्रमांक व दिनांक	कार्यभार धारण केल्याचा दिनांक	परिविक्षा कालावधीत उपभोगलेली रजा	परिविक्षा कालावधी पूर्ण केल्याचा दिनांक
१.	२.	३.	४.	५.	६.
				अर्जित रजा (बालसंगोपन) दि.२२/२/२०१४ ते दि.१९/३/२०१४ **एकूण २६ दिवस असा एकूण ४०१ दिवस**	
३	श्रीमती मिनाक्षी बाजीराव शिरसाट, अधिव्याख्याता, विद्युत अभियांत्रिकी, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,मुंबई	एससीटी-६५११/(७०/११)/ तांशि-७, दि. २४/८/२०११ व एससीटी-६५११/(७०/११)/ (भाग-१)/ तांशि-७, दि. २४/१०/२०११	२५/१०/२०११ (म.पू.)	**निरंक**	२४/१०/२०१३ (म.नं)

०२. श्रीमती लोखंडे, अधिव्याख्याता संगणक अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई यांनी परिविक्षा कालावधीमध्ये स्तंभ-५ येथे नमुद केल्यानुसार एक वर्षापेक्षा जास्त रजा उपभोगल्या आहे. सदर रजेची कारण लक्षात घेता सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक परिवि-२७१५/प्र.क्र.३०२/आठ,दि.२९ फेब्रुवारी, २०१६ मधील परिच्छेद क्र.१ (३) (क) मधील तरतूदीनुसार त्यांचा परिविक्षा कालावधी जास्तीत जास्त एक वर्षाने वाढविण्यात आला आहे.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०१२४१६४१०५७००८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudhir Jaya Shetty

Digitally signed by Sudhir Jaya Shetty
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=72ea277025fdf5a4898b244953b82406eea05963bc456f1e1e8621e5917d8305, serialNumber=e9d37d499a521b728aeb3dc8ec38b759420308b9fd7816002b4af0ffbf1111d7, cn=Sudhir Jaya Shetty
Date: 2018.01.24 16:45:21 +05'30'

(सुधीर जया शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत :

- संबंधित अधिव्याख्याते (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत).

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. सह संचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.
४. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवड नस्ती/तांशि-७.